# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च–एप्रिल २०२२ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

## प्र क ट न

मार्च–एप्रिल २०२२ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | शुक्रवार दि. ०४ मार्च २०२२ ते बुधवार दि. ३० मार्च २०२२ |
| | माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान या विषयांची ऑनलाईन परीक्षा | गुरूवार दि. ३१ मार्च २०२२ ते मंगळवार दि. ०५ एप्रिल २०२२ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | मंगळवार दि. १५ मार्च २०२२ ते सोमवार दि. ०४ एप्रिल २०२२ |
| | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषय लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार दि. ०५ एप्रिल २०२२ ते शनिवार दि. १६ एप्रिल २०२२ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in संकेतस्थळावर दि. २१ डिसेंबर २०२१ पासून उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २१ डिसेंबर २०२१

(श्रीमती अनुराधा ओक)
प्र. सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/३०२/2813
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक 22/12/२०२2

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ट महाविद्यालय,
मुंबई/बृन्हमुंबई/ठाणे/पालघर/ रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार सर्व प्राचार्यांनी व मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई, ४०० ७०३.

**प्रतिः–**

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः–**

१) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/पालघर/रायगड जिल्हा २) शिक्षण निरीक्षक, दक्षिण/उत्तर/पश्चिम विभाग, मुंबई.
३) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.